# महात्मा गांधीजीचे खादी विषयक विचार

प्रा.डॉ. रणदिवे शामराव नानासो
इतिहास विभाग , एस.बी.आर. कॉलेज, म्हसवड,
संलग्न:शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.



## प्रस्तावना :

२१ व्या शतकात जगाला भेडसावणाऱ्या सर्व समस्यांच्या निराकरणाची गुरुकिल्ली म्हणजे महात्मा गांधीचे विचार असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. अनेक विचारवंतानी गांधी तत्वज्ञानाचे महत्व जाणले आहे. दुरदुष्टी असलेल्या गांधीजीनी वर्तमानात आपल्यापुढे उभ्या ठाकणाऱ्या प्रश्नांना जणू अगोदरच हेरलं होतं. केवळ हेरलंच नाही तर असे प्रश्नच उद्‌भवूच नये यासाठी योग्य वेळी सचेतही केलं होत. आज आपण बेरोजगारीसारख्या प्रश्नाला सामोरे जात आहोत. अशावेळी गांधी विचारांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. भारत खेडयाचा देश आहे. खेडयाच्या विकासाशिवाय भारताचा विकास असंभव आहे असे म्हणत 'खेडयाकडे चला' हा संदेश गांधीजीनी दिला. गांधीजीनी स्वावलंबी खेडयाची कल्पना केली होती. म्हणून त्यांनी श्रमावर आधारीत उत्पादन प्रणालीला महत्व दिले. ग्रामोउद्योगाला महत्व दिले. गांधीजी व बेरोजगारीच्या संदर्भात चिंतित होते. त्यांनी आर्थिक असामनतेच्या निराकरणासाठी लघुउद्योगांना भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार मानला. म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनासोबतच खादीच्या प्रचाराचे आंदोलनही चालविले चरखा व खादीला देशाच्या समृद्धी, स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरतेचे प्रतिक मानले.

## खादी व ग्रामोद्योगाचे महत्व :

म. गांधीना सन १९०८ पर्यत चरखा, सूत कताई याबाबत काहीच माहीत नव्हते. असे 'सत्याचा प्रयोग' या पुस्तकात गांधीजी म्हणतात. भारत हा खेडयाचा देश आहे. त्यामुळे खेडयांचा विकास झाल्याशिवाय भारताचा विकास अशक्य आहे असे ते म्हणत. गांधीजी खेडयांना आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण बनवू इच्छीत होते म्हणून त्यांनी ग्रामविकासाला चालना मिळावी म्हणून त्यांनी लघुउद्योग व कुटीरउद्योग निर्मितीला प्रोत्साहन दिले. ग्रामातील लोक प्रामुख्याने शेती करीत असल्याने शेतीवर आधारीत उद्योगाबरोबर खादी उद्योगाला चालना दिली. गांधीजीच्या रचनात्मक कार्यात ग्रामोदयोगाला महत्वपूर्ण स्थान होते. गांधीजीच्या मोठया उद्योगाला विरोध नव्हता. पण लहान उद्योगामुळे ग्रामीण जिवन उध्वस्त होत असल्याने त्यांचा लहान उद्योगाला विरोध होता. कारण यंत्रामुळे बेकारी निर्माण होऊन खेडयातील जनतेच्या उपजिविकेचे साधन हिरावून घेतले जातात. त्यामुळे अशा परिस्थितीत गांधीजीनी ग्रामोद्योगाला त्यातच खादी उद्योगाला विशेष महत्व दिले.

## खादीचा जन्म :

गांधीजीच्या मनात खादी आणि चरख्याचा विचार कसा आला याविषयी त्यांनी 'हिंद स्वराज्य' या पुस्तिकेत म्हटले आहे की, "चरखा आणि खादीशिवाय हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिती सुधारु शकत नाही." याचाच अर्थ असा की, राजकारणात सक्रिय होण्याआधीच खादी व चरख्याची उपयोगीता गांधीजीच्या मनात आलेली होती. सन १९१६ ला गांधीजीनी साबरमती आश्रम स्थापन करुन आश्रमा जीवन जगायला सुरुवात केली. त्यावेळी त्यांनी स्वावलंबनाची आवश्यकता पटली. याच स्वावलंबनाच्या विचारांनी गांधीजी खादी उत्पादनाकडे वळले. त्यांनी अहमदाबादची निवड करुन चरखा व खादी उत्पादनाचा प्रथम प्रयोग तेथे केला. कारण अहमदाबाद हातमागाचे मोठे केंद्र होते. आश्रमात हातमाग सुरु करुन अनेकांना सुतकताई कला शिकण्यास प्रवृत्त केले. सन १९१७ मध्ये गंगाबेन मुजूमदार या धाडसी महिलेने बिजापूर येथे सुतकताई केंद्राची स्थापना केली. अशा प्रकारे खादी उद्योगाला सुरुवात झाली. चरख्यामध्ये विविध प्रयोग करण्यात येवून त्यामधून अधिक चांगले धागे काढून सुती, रेशमी, उष्ण वस्त्र तयार होवू लागली. गांधीजीनी भारतीय अर्थव्यवस्थेचा गांभीर्याने विचार करुन खादी कापड उद्योगाचा मार्ग देशापुढे ठेवला. गांधीजीच्या खादी विषयक

विचारांमध्ये आपल्याला व्यवहारवाद दिसून येतो. तसेच स्वदेश, स्वाभिमान व स्वावलंबन याविषयीच्या भावना त्यांच्या खादी विषयक विचारांमधून दिसून येतात. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी व्यवसायाला आधार देण्याचे तसेच ग्रामीण लघूउद्योगांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्वाचे कार्य गांधीजीनी या माध्यमातून केले.

## चरखा संघाची स्थापना :

सन १९२० मध्ये विनोबा भावे साबरमती आश्रमात सुतकताईचे काम शिकत होते. महाराष्ट्रात सूतकताई कामाचा विस्तार व्हावा म्हणून विनोबा भावे यांनी दि. १९ एप्रिल १९२१ रोजी वर्धा येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर कॉग्रेस पक्षाची धुरा महात्मा गांधीजीच्या हाती येताच कॉग्रेस महासमितीने २० लाख नविन चरखे बनवून त्याचा प्रसार संपूर्ण भारतात करण्याचा प्रस्ताव सन १९२३ मध्ये 'काकीनाडा' कॉग्रेस अधिवेशनात ठराव मांडण्यात आला 'अखिल भारतीय खादी मंडळाची' स्थापना झाली असली तरी खादी वस्त्राची निर्मिती पाहिजे त्याप्रमाणात होत नव्हती. त्याचे कारण म्हणजे कॉग्रेसचे लक्ष फक्त राजकारणाकडे होते. खादीचा विकास व्हावा म्हणून गांधीजीनी दि. २२ सप्टेंबर १९२५ रोजी अखिल भारत चरखा संघाची स्थापना केली. ज्याआधारे मोठापक्ष कॉग्रेस व त्याद्वारे चरखा व खादी उद्योगाला प्रोत्साहन देणे सहज शक्य झाले. भारताच्या विविध भागात चरखा संघ स्थापन झाल्यामुळे, चरखा संशोधनाला व खादी उद्योगाला अधिक चलना मिळाली.

## खादी उद्योगाची वाटचाल :

भारतातील ८० टक्के जनता ग्रामीण भागामध्ये रहात असून ग्रामीण भागाचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. ग्रामीण भागातच रोजगार निर्माण झाला पाहिजे. गांधीजीनी गरीबी व बेरोजगारी नष्ट करण्यासाठी नैसर्गिक व मानवनिर्मित साधनाद्वारे ग्रामीण उद्योगाविकासावर भर दिला. खादी उद्योगासंदर्भात गांधीजीचा दृष्टीकोन ग्रामीण औद्योगीकरण आणि खादी असा दिसतो. राष्ट्रीय एकात्मतेला प्रेरक ठरेल. पुढे खादी उद्योगाला निश्चित स्वरुप प्राप्त झाले सन १९५३ मध्ये अखिल भारतीय खादी आणि ग्रामउद्योग नावाचे मंडळ स्थापन झाले. त्याद्वारे खादी विकासाच्या कार्यक्रमासाठी अनुदान देण्याची देण्याची सुविधा करण्यात आली. सन १९६५ ते १९७१ या काळात खादी उत्पादन व विक्री वाढविण्याकरिता तांत्रीक सुधारणा करण्यात येवून खादी उद्योगाच्या विकासासाठी पहिल्या चार पंचवार्षिक योजनामध्ये २५६ करोड रुपयांची तरतूद करण्यात आली. आज भारतामध्ये मुंबई, नवीदिल्ली, कलकत्ता, मद्रास, बेंगलोर , पटना, राजकोट इत्यादी ठिकाणी खादीची विक्री करणारे 'खादी ग्राम उद्योग भवन' स्थापन केलेले आहे. आज भारताच्या अनेक भागात छोटी–मोठी केंद्रे खादी उद्योगाला पुढे नेत आहे. आज खादीच्या उच्च ब्रॅण्डची माहिती घेतली तरी घाम फुटेल. खादीचे बॅण्डस् साधारण अडीच ते तीन हजारपासून सुरु होऊन ती २५ ते ३० हजारापर्यंत जाते. गांधीजीच्या विचारांचे प्रतिबिंब खादीमधून हळूहळू अदृश्य होत आहे. भविष्यात खादी उद्योग यशाचे उंच शिखर गाठले याची खात्री वाटते.

## समारोप :

महात्मा गांधीनी स्वत:वर खादी परिधान केली. त्याचबरोबर संपूर्ण देशाला सुद्धा खादी परिधान करण्यास भाग पाडले. नुकत्याच झालेल्या भारताच्या आर्थिक अहवालानुसार जीडीपी मध्ये खादीचा सिंहाचा वाटा आहे. गांधीची खादीला नैतिकतेची जोड दिली. खादी घालून व्यभिचार करने, दारु पिणे पाप समजले जाऊ लागले म्हणून म्हटले गेले खादी वस्त्र नाही तर एक विचाराधारा आहे. महात्मा गांधीजीच्या खादी प्रचार व प्रसार कार्यामुळे संपूर्ण देशात त्याचा परिणाम होऊन जनतेने मोठया प्रमाणात खादी वस्त्रे वापरणे सुरु केले आहे. खादी वापरामुळे ग्रामीण भागात या उद्योगाची भरभराट झाल्यामुळे सोबत इतर कुटीर उद्योगाचाही विकास झाला. खादी व सुतकताई व्यवसायामुळे ग्रामीण भागातील आर्थिक समृद्धीत भर पडली. खादी मंडळाच्या व भारत सरकारच्या प्रसारामुळे भारताबरोबर विदेशातही एक फॅशन म्हणून खादीचा वापर मोठया प्रमाणात होत आहे.

## संदर्भ सूची

१. धर्माधिकारी दादा, मानवतेचा मापदंड: महात्मा गांधी, परंमधाम प्रकाशन वर्धा, १९९४
२. गोखले द. न., गांधीजी मानव नि महामानव, मौजे प्रकाशन गृह, मुंबई २००८
३. पवार जयसिंगराव, हिंदुस्थापनच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९२.
४. गांधी मो.के., सत्याचे प्रयोग, रिया पाब्लिकेशन, कोल्हापूर २०१३
५. गांधी महात्मा, माझ्या स्वप्नांतील भारत, साकेत प्रकाशन, पुणे २००२
६. पाटील वा.भा., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००९
७. मोरे संग्राम, ग्रामीण विकासाचे राजकारण आणि कॉग्रेस, अरुणा प्रकाशन, लातूर २०१०
८. पाटील डी.आर.महात्मा गांधी विचार व समकालीन विचार, अर्थव पब्लिकेशन, धुळे, २०१२

९. चौधरी किका, वर्धा जिल्हा गॅझेटीअर, महाराष्ट्र शासन विभाग मुंबई १९९२
१०.गांधी मो. क., संक्षिप्त आत्मकथा, नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद १९५१